# राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
# महाराष्ट्र राज्य, पुणे

रासनिप्रा

जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, ५ बी. जे. रोड, पुणे –४११००१.
फोन नं. - (०२०) २६०५०६४१
मेल आयडी - sceapune@gmail.com वेब साईट - scea.maharashtra.gov.in


जा.क्र.रासनिप्रा/ कक्ष- ११/ बाजार समिती/निवडणूक निरीक्षक /कार्य/2934/सन २०२३

निवडणूक प्राधान्य

दिनांक :20/०३/२०२३

**वाचले** :- १. महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ चे कलम १४ अ (१) (अ) मधील तरतुद

२. महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (दुसरी सुधारणा) अधिनियम २०२०, दिनांक १४.३.२०२०

३. महाराष्ट्र कृषि उत्पन्न बाजार समिती (समितीची निवडणूक) (पहिली सुधारणा) नियम २०२०, दिनांक १६.४.२०२१

४. या प्राधिकरणाकडील आदेश जा.क्र. १४५३/सन २०२१, दिनांक २९.०४.२०२१

५. महाराष्ट्र कृषि उत्पन्न बाजार समिती (समितीची निवडणूक) नियम २०१७ चे नियम ३ (तीन) मधील तरतुद

६. महाराष्ट्र कृषि उत्पन्न बाजार समिती (समितीची निवडणूक) नियम २०१७ चे नियम ३ (चार) मधील तरतुद

**प्रस्तावना :-**

ज्या अर्थी, महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ चे कलम १४ अ (१) (अ) मधील तरतुदीनुसार राज्यातील कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या निवडणूकांचे अधिक्षण, निर्देशन व नियंत्रण करण्याची जबाबदारी राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणावर सोपवलेली आहे. आणि,

ज्या अर्थी, प्राधिकरणाने वाचले क्रमांक ४ च्या आदेशानुसार जिल्हयांतील कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या निवडणूका घेण्याकरीता करीता संबंधित जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांना 'जिल्हा निवडणूक अधिकारी (कृ.उ.बा.स.)' म्हणून घोषित केलेले आहे. आणि,

ज्या अर्थी, वाचले क्र. ५ मधील तरतुदीनुसार कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या निवडणूका सुरळीतपणे व मुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी व कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या निवडणूक प्रक्रियेचे निरीक्षण करण्यासाठी निवडणुक निरीक्षकांची नियुक्ती करण्याचे अधिकार प्राधिकरणास प्राप्त आहेत. निवडणूक निरीक्षकांना प्राधिकरणाचे कान व डोळे म्हणून भूमिका पार पाडावयाची असल्यामुळे निवडणूक निरीक्षकांची निवडणूक प्रक्रियेचे निरीक्षण करण्यासाठी कामे / जबाबदारी निश्चित करणे आवश्यक झालेले आहे. आणि,

ज्या अर्थी, कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या निवडणूक प्रक्रिया या अटीतटीच्या, चुरशीच्या व संवेदनशील स्वरुपाच्या असल्यामुळे जिल्हयातील कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या निवडणूक प्रक्रियेचे निरीक्षण करणेकरीता जबाबदार अधिकाऱ्यांची नियुक्ती करणे आवश्यक असल्यामुळे सदर नियुक्तीचे निकष निश्चित करणे आवश्यक आहे. आणि,

ज्या अर्थी, महाराष्ट्र कृषि उत्पन्न बाजार समिती (समितीची निवडणूक) नियम २०१७ चे नियम ३ (चार) मधील तरतुदीनुसार कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या निवडणूका सुरळीतपणे व मुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी अधिनियम व नियमांच्या तरतुदींशी सुसंगत असतील असे विशेष किंवा सर्वसाधारण आदेश पारीत करण्याचे अधिकार प्राधिकरणास प्राप्त आहेत.

त्या अर्थी, निवडणूक निरीक्षकांची कामे / जबाबदारी निश्चित करणे बाबत प्राधिकरण खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

-:: **आदेश** ::-

महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ चे कलम १४ अ (१) (अ), महाराष्ट्र कृषि उत्पन्न बाजार समिती (समितीची निवडणूक) नियम २०१७ चे नियम ३ (चार) व नियम ३ (तीन) मधील तरतुदीनुसार प्राप्त अधिकारानुसार प्राधिकरण निवडणूक निरीक्षक नियुक्ती निकष व निवडणूक निरीक्षक व सहाय्यक निवडणूक निरीक्षकांची निवडणूक प्रक्रियेचे निरीक्षण करण्यासाठी कामे / जबाबदारी खालील प्रमाणे निश्चित करीत आहे.

१. जिल्हयाच्या ठिकाणी असलेल्या कृषि उत्पन्न बाजार समितीच्या निवडणूक प्रक्रियेचे निरीक्षण संबंधित निवडणूक निरीक्षकांनी करावे आणि जिल्हयातील इतर कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या निवडणूक प्रक्रियांचे निरीक्षण निवडणूक निरीक्षकांनी नियुक्त केलेल्या सहाय्यक निवडणूक निरीक्षकांनी करावे.

२. प्राधिकरण निवडणूक निरीक्षक म्हणून उपसचिव किंवा सह सचिव दर्जाच्या एका अधिकाऱ्याची नियुक्ती करीत आहे .निवडणूक निरीक्षक यांनी राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाच्या पर्यवेक्षणाखाली व नियंत्रणाखाली कार्ये पार पाडावीत.

३. निवडणूक निरीक्षक यांनी जिल्हयातील इतर बाजार समित्यांच्या निवडणूकीकरीता तालुक्यातील तहसिलदार किंवा समकक्ष अधिकाऱ्यांची सहाय्यक निवडणूक निरीक्षक म्हणून नियुक्ती करावी. सहाय्यक निवडणूक निरीक्षक यांनी निवडणूक निरीक्षक यांच्या पर्यवेक्षणाखाली व नियंत्रणाखाली व राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाच्या सर्वसाधारण नियंत्रणाखाली कार्ये पार पाडावीत.

४. निवडणूक निरीक्षक व सहाय्यक निवडणूक निरीक्षक यांना त्यांच्या मुळ वेतनाच्या १०% या प्रमाणात मानधन अनुज्ञेय राहील.

५. **नामनिर्देशन प्रक्रियेचे निरीक्षण** :-

- निवडणूक निर्णय अधिकारी (नि.नि.अ.) यांनी नामनिर्देशन पत्र वितरण व स्वीकृती केली आहे किंवा कसे.
- नि.नि.अ. यांनी निवडणूकीबाबत आवश्यक ती प्रसिध्दी दिलेली आहे काय याबाबतची खात्री करून मतदानाची जास्तीत जास्त टक्केवारी होण्याकरीता प्रयत्न केलेले आहेत काय याबाबत शहानिशा करावी.
- प्राप्त नामनिर्देशन पत्रांची यादी नि.नि.अ.यांनी वेळच्या वेळी व मंजूर निवडणूक कार्यक्रमामध्ये नमूद केलेल्या विहीत वेळेवर प्रसिध्द केली आहे काय याची शहानिशा करावी.
- प्राप्त नामनिर्देशन पत्रांवर नि.नि.अ.यांनी प्राप्त नामनिर्देशन पत्राचा क्रमांक व दिनांक आणि वेळ नमुद केली आहे काय याची शहानिशा करावी.

६. **नामनिर्देशनपत्र छाननी प्रक्रियेचे निरीक्षण** :-

- नामनिर्देशन पत्रांची छाननी स्वत: नि.नि.अ. यांनी केली आहे काय याची शहानिशा करावी.
- छाननीवेळी संबंधीत निवडणूक निर्णय अधिकारी यांनी गंभीर स्वरुपाच्या दोषावरुन नामनिर्देशन पत्र नामंजूर केलेले आहे की, किरकोळ त्रुटींकरीताही नामनिर्देशन पत्रे नामंजूर केलेली आहेत याचे निरीक्षण आवश्यक आहे.
- नि.नि.अ. यांनी नामनिर्देशन पत्रावर नामंजूर/मंजूर शेरा नमुद करुन स्वाक्षरी केली आहे काय याची शहानिशा करावी.
- नि.नि.अ. यांनी प्राप्त आक्षेपांची संक्षिप्त चौकशी केली आहे काय ?
- नि.नि.अ. यांनी म्हणणे सादर करण्यास संबंधीत नामनिर्देशीत व्यक्तीस संधी दिली काय ?

- संधीची मुदत संपल्यानंतर नि.नि.अ.यांनी निर्णय दिला काय ?
- छाननी कामकाजाचे नि.नि.अ. यांनी इतिवृत्तांत केला आहे काय ?
- नामंजूर नामनिर्देशन पत्रांचा अहवाल कारणांसह राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणास / जिल्हा निवडणूक अधिकारी (कृ.उ.बा.स.) यांना सादर केला आहे काय ?

७. **मतदानापूर्वी निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराचे निधन होणे :-** मतदानापूर्वी निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराचे निधन झाल्याच्या खात्री अंती मतदानाबाबत नि.नि.अ. यांनी प्रत्यादेश दिल्याची बाब प्राधिकरणास अवगत करणे.

८. **मतदान पूर्व व्यवस्थापन :-**

- नि.नि.अ. यांनी पुरेसे, मतदारांकरीता सोईचे व निवडणूक प्रक्रिया राबविण्याकरीता सुरक्षित मतदान केंद्र उभारले आहेत किंवा कसे ?
- मतदान केंद्रावर पुरेसा अधिकारी / कर्मचारी वर्ग यांची नियुक्ती केली आहे काय ?
- संवेदनशील मतदान केंद्र शोधणे व त्या ठिकाणी कायदा आणि सुव्यवस्था कायम राहील या दृष्टीने योग्य नियोजन करणे.
- मतदानाकरीता निश्चित केलेले बूथ हे वयोवृद्ध व अपंगांना मतदानाकरीता येण्यास सोयीस्कर आहे काय ? ते तळमजल्यावर आणि रॅम्पसह आहेत काय ? याबाबतची पाहणी करणे.

९. **मतदान प्रक्रियेचे निरीक्षण :-**

- मतदान निर्धारीत वेळेत सुरू होते किंवा कसे याची खात्री करणे.
- मतदान केंद्रावरील व्यवस्थेची पाहणी करणे.
- मतदानावेळी मतदारांची ओळख पटवली जाते किंवा कसे याची खात्री करणे.
- मतदानानंतर मतपेटया मोहोरबंद केल्या आहेत किंवा कसे ? याची खात्री करणे.
- मतदानानंतर मतपत्रिकांचा हिशोब नमुना क्रमांक १७ मध्ये मतदान प्रतिनिधींना दिला किंवा कसे ? याची खात्री करणे.
- मंजूर निवडणूक कार्यक्रमाप्रमाणे मतदान विहीत मुदतीमध्ये समाप्त झाले किंवा कसे ? याची खात्री करणे.
- मतदानानंतर सिलबंद मतपेटयांची वाहतूक व मतमोजणीपर्यंत त्याची आवश्यक सुरक्षितता याबाबत योग्य उपाययोजनांची व्यवस्था केलेली आहे काय ? याबाबतची खात्री करणे.
- संबंधित कृषि उत्पन्न बाजार समितीच्या बाबतीत आवश्यकता विचारात घेऊन, पूर्वइतिहास व सभासदांमधील गटबाजी या बाबी विचारात घेऊन सिलबंद मतपेटया ठेवलेल्या स्ट्राँगरूमभोवती पोलीस बंदोबस्त, निर्मन्युष्य जागा व सी.सी.टि.व्ही यांची व्यवस्था केलेली आहे काय ? याबाबतची खात्री करणे.

१०. **मतमोजणी प्रक्रियेचे निरीक्षण :-**

- मतमोजणी प्रक्रिया विहीत वेळेवर सुरु करण्यात आली आहे किंवा कसे याची खात्री करावी.
- मतमोजणी प्रक्रिया पारदर्शकपणे व नियमानुसार पार पडली आहे किंवा कसे याची खात्री करावी.
- मतमोजणी प्रक्रिया दरम्यान काही अनुचित प्रकार घडल्यास, तो प्राधिकरणाच्या निदर्शनास आणून देण्यात यावा.

११. **आचार संहिता अंमलबजावणी :-**

- प्राधिकरणाने कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या निवडणूकांकरीता आदर्श आचार संहिता लागू केलेली आहे. सदर आदर्श आचार संहितेची अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हा निवडणूक अधिकारी यांना

सूचित केलेले आहे. त्यानुसार आदर्श आचार संहितेचे अनुपालन झाले आहे किंवा कसे याची खात्री करावी.

**१२.कायदा व सुव्यवस्था यांचे व्यवस्थापन :-**

- संबंधित पोलीस अधिक्षक अथवा पोलिस आयुक्त व जिल्हा निवडणूक अधिकारी (कृ.उ.बा.स.) यांच्याशी समन्वय साधून संपूर्ण निवडणूक प्रक्रियेत कायदा व सुव्यस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

**१३.मतदान व मतमोजणी प्रशिक्षण :-** निवडणूक प्रयोजनार्थ नियुक्त अधिकारी / कर्मचारी यांना मतदान व मतमोजणी अनुषंगाने आवश्यक प्रशिक्षण दिले आहे याची खात्री करणे.

**१४.निवडणूक निरीक्षक व सहाय्यक निवडणूक निरीक्षक यांना सहाय्य :-**

- जिल्हा निवडणूक अधिकारी (कृ.उ.बा.स.) यांनी निवडणूक निरीक्षक व सहाय्यक निवडणूक निरीक्षक यांना सहाय्य करावे.
- निवडणूक निरीक्षक व सहाय्यक निवडणूक निरीक्षक यांनी निवडणूक प्रक्रियेचे निरीक्षण करणेकरीता शासकीय वाहन अथवा अधिग्रहित वाहनाचा वापर करावा.
- शासकीय वाहन अथवा अधिग्रहित वाहनाकरीता प्रवासाच्या प्रमाणात इंधन खर्च करावा.
- निवडणूक कार्यक्रमाची प्रत, महाराष्ट्र कृषि उत्पन्न बाजार समिती (समितीची निवडणूक) नियम २०१७ ची व सदर नियमात वेळोवेळी झालेल्या सुधारणांची प्रत, प्राधिकरणाने निर्गमित केलेले आदेश / परिपत्रक / मार्गदर्शक सूचना इ. च्या प्रती यांचा संच उपलब्ध करावा.
- निवडणूकीकरीता नियुक्त कर्मचाऱ्यांची यादी भ्रमणध्वनीसह उपलब्ध करावी.
- निवडणूकीकरीता निर्धारीत करण्यात आलेली तसेच त्यामधील संवेदनशील मतदान केंद्राची माहिती अवगत करणे.

**१५.** निवडणूक प्रक्रियेचे निरीक्षण करुन या आदेशासोबत जोडलेले अहवाल क्रमांक १, अहवाल क्रमांक २, अहवाल क्रमांक ३ व अहवाल क्रमांक ४ विहित मुदतीत प्राधिकरणास सादर करणे निवडणूक निरीक्षक व सहाय्यक निवडणूक निरीक्षक यांचेवर बंधनकारक आहे. सहाय्यक निवडणूक निरीक्षकांनी उपरोक्त अहवाल निवडणूक निरीक्षकांच्या मार्फत प्राधिकरणास सादर करावेत.

**१६.** या आदेशाचे सर्व संबंधितांनी काटेकोरपणे पालन करावे.

**मा. आयुक्त, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे मान्यतेने.**

राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण महाराष्ट्र राज्य, पुणे-१. सत्यमेव जयते

(डॉ.पी.एल.खंडागळे)
सचिव,
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

**प्रत :-**

१. जिल्हा निवडणूक अधिकारी (कृ.उ.बा.स.) (सर्व)
२. निवडणूक निरीक्षक (संबंधित)
३. सहाय्यक निवडणूक निरीक्षक (संबंधित)
४. निवडणूक निर्णय अधिकारी (संबंधित)

**प्रत माहितीस्तव व आवश्यक कार्यवाहीस्तव :-**

१. सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती (संबंधित)

(राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाकडील आदेश जा.क्र. ........... / सन २०२३, दिनांक .............
सोबत जोडलेले परिशिष्ट)

## अहवाल क्रमांक १

(अंतिम उमेदवारांची यादी चिन्हांसह प्रसिध्द झाल्यानंतर २४ तासांचे आत सादर करावयाचा अहवाल)

| अ.क्र. | विषय | तपशील |
|---|---|---|
| १. | निवडणूक / सहय्यक निवडणूक निरीक्षकाचे नाव | |
| २. | पदनाम | |
| ३. | कृषि उत्पन्न बाजार समितीचे नाव | |

| अ.क्र. | विषय | निरीक्षक यांचा अहवाल |
|---|---|---|
| | **नामनिर्देशन प्रक्रिया** | |
| १. | निवडणूक निर्णय अधिकारी यांनी मुदतीत नामनिर्देशन पत्र वितरण व स्वीकृती केली आहे किंवा कसे ? | होय/नाही. |
| २. | प्राप्त नामनिर्देशन पत्रांची यादी निवडणूक निर्णय अधिकारी यांनी वेळच्या वेळी प्रसिध्द केली आहे किंवा कसे ? | होय/नाही. |
| ३. | प्राप्त नामनिर्देशन पत्रांवर निवडणूक निर्णय अधिकारी यांनी क्रमांक व दिनांक नमुद केला आहे किंवा कसे ? | होय/नाही. |
| ४. | निवडणूक निर्णय अधिकारी यांनी नामनिर्देशन पत्र तपासून लेखन अथवा तांत्रिक दोष सुधारण्यास परवानगी दिली आहे किंवा कसे ? | होय/नाही. |
| | **नामनिर्देशनपत्र छाननी प्रक्रिया** | |
| १. | नामनिर्देशन पत्रांची छाननी स्वत: निवडणूक निर्णय अधिकारी यांनी केली आहे किंवा कसे ? | होय/नाही. |
| २. | छाननीवेळी संबंधीत निवडणूक निर्णय अधिकारी यांनी गंभीर स्वरुपाच्या दोषावरुन नामनिर्देशन पत्र नामंजूर केलेले आहेत किंवा कसे ? | होय/नाही. |
| ३. | निवडणूक निर्णय अधिकारी यांनी नामनिर्देशन पत्रावर नामंजूर/मंजूर शेरा नमुद करुन स्वाक्षरी केली आहे किंवा कसे ? | होय/नाही. |
| ४. | निवडणूक निर्णय अधिकारी यांनी प्राप्त आक्षेपांची संक्षिप्त चौकशी केली आहे किंवा कसे ?, | होय/नाही. |
| ५. | निवडणूक निर्णय अधिकारी यांनी म्हणने सादर करण्यास संबंधीत नामनिर्देशीत व्यक्तीस संधी दिली आहे किंवा कसे ? | होय/नाही. |
| ६. | संधीची मुदत संपल्यानंतर निवडणूक निर्णय अधिकारी यांनी निर्णय दिला किंवा कसे ? | होय/नाही. |
| ७. | छाननी कामकाजाचे निवडणूक निर्णय अधिकारी यांनी इतिवृतांत केला आहे किंवा कसे ? | होय/नाही. |
| ८. | निवडणूक निर्णय अधिकारी यांनी नामंजूर नामनिर्देशन पत्रांबाबत संबंधीत उमेदवारास | होय/नाही. |

| | | |
|---|---|---|
| | नामंजूरीच्या कारणांसह लेखी कळवले आहे किंवा कसे ? | |
| | शेरा | |

दिनांक

निवडणूक निरीक्षक / सहाय्यक निवडणूक निरीक्षक
यांची स्वाक्षरी

*******************************************************************

**अहवाल क्रमांक २**

**(मतदान प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर २४ तासांमध्ये सादर करावयाचा अहवाल)**

| अ.क्र. | विषय | तपशील |
|---|---|---|
| १. | निवडणूक / सहाय्यक निवडणूक निरीक्षकाचे नाव | |
| २. | पदनाम | |
| ३. | कृषि उत्पन्न बाजार समितीचे नाव | |

| अ.क्र. | विषय | निरीक्षक यांचा अहवाल |
|---|---|---|
| | **मतदान पूर्व व्यवस्थापन** | |
| १. | निवडणूक निर्णय अधिकारी यांनी पुरेसे व सोईचे मतदान केंद्र उभारले आहेत किंवा कसे ? | होय/नाही. |
| २. | मतदान केंद्रावर पुरेसा अधिकारी/कर्मचारी वर्ग यांची नियुक्ती केली आहे किंवा कसे ? | होय/नाही. |
| ३. | संवेदनशील मतदान केंद्र शोधून त्या ठिकाणी अनुभवी अधिकारी/कर्मचारी आणि आवश्यक शांतता व सुव्यवस्थकरीता पोलीस बंदोबस्ताचे नियोजन केले आहे काय ? | होय/नाही. |
| ४. | मतदान केंद्रावर येणाऱ्या अपंगांना व्हीलचेअरसह मतदान केंद्रावरील कक्षापर्यंत जाण्याकरीता Ramp ची व्यवस्था होती काय ? | होय/नाही. |
| | **मतदान प्रक्रिया** | |
| १. | मतदान निर्धारीत वेळेत सुरू झाले किंवा कसे ? | होय/नाही. |
| २. | मतदान केंद्रावरील व्यवस्था अचूक आहे किंवा कसे ? | होय/नाही. |
| ३. | मतदानावेळी मतदारांची ओळख पटवली जाते किंवा कसे ? | होय/नाही. |
| ४. | मतदान प्रक्रिया मंजूर निवडणूक कार्यक्रमाप्रमाणे विहित वेळेमध्ये बंद करण्यात आली आहे काय ? | संक्षिप्त अहवाल |
| ५. | मतदानानंतर मतपेटया मोहोरबंद केल्या आहेत किंवा कसे ? | होय/नाही. |
| ६. | मतदानानंतर मतपत्रिकांचा हिशोब मतदान प्रतिनिधींना दिला किंवा कसे ? | होय/नाही. |
| ७. | मतदान समाप्त अहवाल प्राधिकरणास अवगत करणे | होय/नाही. |
| ८. | मतदानानंतर त्याच दिवशी मतमोजणी नसल्यास | संक्षिप्त अहवाल |

| | | |
|---|---|---|
| | व मतदान आणि मतमोजणीचे ठिकाण वेगळे असल्यास सिलबंद मतपेटयांच्या वाहतूकीचा आराखडा तयार करुन त्याची अंमलबजावणी करण्यात आली आहे काय ? | |
| ९. | मतमोजणीचे ठिकाण सिलबंद मतपेटया सुरक्षीत ठेवण्याकरीता कक्ष (Strong Room) तयार करुन त्याठिकाणी सी.सी.टि.व्ही. ची व्यवस्था केली आहे काय ? | होय/नाही. |
| १०. | मतमोजणीचे ठिकाण सिलबंद मतपेटया सुरक्षीत ठेवण्याकरीता करण्यात आलेला कक्ष (Strong Room) निर्मनुष्य करुन पोलीसांचे ताब्यात देण्यात आला आहे काय ? | होय/नाही. |
| ११. | मतदान प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर मतपेटया सिलबंद करुन सुरक्षित ठिकाणी पोहेचल्याचा अहवाल प्राधिकरणास अवगत करणे. | होय/नाही. |
| | शेरा | |

दिनांक

निवडणूक निरीक्षक / सहाय्यक निवडणूक निरीक्षक
यांची स्वाक्षरी

**************************************************************************

**अहवाल क्रमांक ३**

**(मतमोजणी प्रकिया पूर्ण झाल्यानंतर २४ तासांमध्ये सादर करावयाचा अहवाल)**

| अ.क्र. | विषय | तपशील |
|---|---|---|
| १. | निवडणूक / सहाय्यक निवडणूक निरीक्षकाचे नाव | |
| २. | पदनाम | |
| ३. | कृषि उत्पन्न बाजार समितीचे नाव | |

| अ.क्र. | विषय | निरीक्षक यांचा अहवाल |
|---|---|---|
| | **मतमोजणी प्रकियेचे निरिक्षण करणे** | |
| १. | मतमोजणी प्रक्रिया विहीत वेळेवर सुरु करण्यात आली आहे किंवा कसे ? | होय/नाही. |
| २. | मतमोजणी प्रक्रिया पारदर्शकपणे व नियमानुसार पार पडली आहे किंवा कसे ? | होय/नाही. |
| ३. | मतमोजणी प्रक्रिया दरम्यान काही अनुचित प्रकार घडल्यास, तो प्राधिकरणाच्या निदर्शनास आणला आहे किंवा कसे ? | होय/नाही. |
| | **आचार संहिता अंमलबजावणी** | |
| १. | आदर्श आचार संहितेचे अनुपालन झाले आहे किंवा कसे ? याची खात्री करावी. | होय/नाही. |

| कायदा व सुव्यवस्था व्यवस्थापन | | |
|---|---|---|
| १. | संबंधित पोलीस अधिक्षक अथवा पोलिस आयुक्त व जिल्हा निवडणूक अधिकारी (कृ.उ.बा.स.) यांच्याशी समन्वय साधून संपूर्ण निवडणूक प्रक्रियेत कायदा व सुव्यस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही याची दक्षता घेतली आहे किंवा कसे ? | संक्षिप्त अहवाल |
| **मतदान व मतमोजणी प्रशिक्षण** | | |
| १. | निवडणूक प्रयोजनार्थ नियुक्त अधिकारी/कर्मचारी यांना प्रशिक्षण दिले आहे किंवा कसे ? | होय/नाही. |
| | शेरा | |

दिनांक

निवडणूक निरीक्षक / सहाय्यक निवडणूक निरीक्षक
यांची स्वाक्षरी

***********************************************************************************

## अहवाल क्रमांक ४

**(नि.नि.अ. यांनी मतदाना संदर्भात प्रत्यादेश दिल्यानंतर २४ तासांमध्ये सादर करावयाचा अहवाल)**

| अ.क्र. | विषय | तपशील |
|---|---|---|
| १. | निवडणूक / सहाय्यक निवडणूक निरीक्षकाचे नाव | |
| २. | पदनाम | |
| ३. | कृषि उत्पन्न बाजार समितीचे नाव | |

| अ.क्र. | विषय | निरीक्षक यांचा अहवाल |
|---|---|---|
| **मतदानापूर्वी निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराचे निधन होणे** | | |
| १. | मतदानापूर्वी उमेदवाराचे निधन झाल्याच्या खात्री अंती मतदानाबाबत निवडणूक निर्णय अधिकारी यांनी प्रत्यादेश दिल्याची बाब प्राधिकरणास अवगत करणे. | संक्षिप्त अहवाल |
| | शेरा | |

दिनांक

निवडणूक निरीक्षक / सहाय्यक निवडणूक निरीक्षक
यांची स्वाक्षरी

***********************************************************************************

(डॉ.पी.एल.खंडागळे)
सचिव,
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य, पुणे.